ePaper

## अजित पवार गटाला ताकीद! चिन्हाबाबत निर्देश तंतोतंत पाळा—सर्वोच्च न्यायालय



| वर्ष - 7 | अंक - 315 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- कोलकाता रायडर्सचा मोठा विजय!
- अदाने नेसली चक्क १५ रुपयांची साडी
- मी मशाल चिन्हावर लढवणार
- उमेदवार बदलण्याची नामुष्की

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 4 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'आरटीई'साठी 322 शाळांची नोंदणी!

## » पिंपरी-चिंचवडमध्ये 8 हजार 50 जागांवर होणार प्रवेश

| पिंपरी | महाईन्यूज

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) पिंपरी चिंचवड शहरातील खासगी शाळांमध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखीव 25 टक्के जागांवरील प्रवेश प्रक्रिया लागू असणाऱ्या शाळांची नोंदणी प्रक्रिया 6 मार्चपासून सुरु झाली होती. मार्च अखेर शहरात आरटीईसाठी सध्या खासगी अनुदानित, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित,महापालिका, खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांची नोंदणी करून घेण्यात आली आहे. शहरात 322 शाळांनी नोंदणी केली आहे. 8 हजार 50 जागांवर आरटीईतून प्रवेश दिले जाणार आहेत.**




आरटीई कायद्यात झालेल्या बदलामुळे सरकारी व खासगी अनुदानित शाळांमध्ये सुद्धा आरटीई अंतर्गत प्रवेश दिले जाणार आहेत. त्यामुळे यंदा आरटीई प्रवेशासाठी पात्र असलेल्या शाळांची संख्या वाढली आहे. यंदा 322 शाळांमधील 8 हजार 50 जागांवर आरटीईतून प्रवेश दिले जाणार आहेत. 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून 'आरटीई'अंतर्गत पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये 25 टक्के प्रवेश मोफत मिळणार नाहीत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून एक किलोमीटरवरील सरकारी किंवा अनुदानित, अंशत: अनुदानित शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागणार आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटरवर सरकारी किंवा खासगी अनुदानित शाळा नाही, त्या विद्यार्थ्यांना त्या परिसरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्याची मुभा असणार आहे. पण, शाळांच्या मॅपिंगमुळे त्या विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किलोमीटरवर खरोखरच सरकारी शाळा नाहीत, याची खात्री केली जाणार आहे.

दरम्यान, 'आरटीई'अंतर्गत शहरातील 322 शाळांची नोंदणी पूर्ण झाली असून, आता या सर्व शाळांचे मॅपिंग होईल. पिंपरी विभागातून 133 तर आकुर्डी विभागातून 189 शाळांची नोंद झाली आहे. त्यानंतर 'आरटीई'तून प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मागवून घेतले जातील. विद्यार्थ्यांना शाळांचा प्राधान्यक्रम द्यावा लागेल आणि त्यानुसार त्यांना संबंधित शाळांमध्ये प्रवेश मिळतील. दरवर्षी डिसेंबर-जानेवारीत सुरू होणारी आरटीई प्रवेश प्रक्रिया मार्च संपला तरी सुरू झालेली नाही. प्रवेशाची प्रक्रिया सुरु होण्यासाठी आणखी अजून किती काळ वाट पहावी लागणार असा प्रश्न पालकांना पडला आहे.

### प्रक्रियेला हवी गती

» वास्तविक, लोकसभा निवडणुकीत २०१९ आणि आताही विलास लांडे यांना संधी मिळाली. आगामी विधानसभा निवडणुकीत भोसरी विधानसभा मतदार संघ विद्यमान आमदार महेश लांडगे यांची महायुतीकडून उमेदवारी निश्चित आहे. त्यामुळे महायुतीमध्ये संधी नाही, ही बाब सांगण्यासाठी कोणत्याही ज्योतिषाची आवश्यकता नाही. अशी परिस्थिती जुन्नरमध्ये शरद सोनवणे यांच्याबाबत होणार आहे. त्या ठिकाणी महायुतीमध्ये राष्ट्रवादीचे आमदार अतुल बनके यांचा पहिला दावा उमेदवारीवर राहणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीची सोय म्हणून या दोन्ही नेत्यांना महायुतीला 'जय महाराष्ट्र' केल्याखेरीज पर्याय दिसत नाही.

# सनदी लेखापालांचा लोकससभेसाठी १०० टक्के मतदानाचा निर्धार!

## » पिंपरी चिंचवड शहरातील नवोदीत मतदार आणि नागरिकांनी लोकशाही उत्सवात सहभागी व्हावे

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी चिंचवड शहरातील सनदी लेखापाल, नवोदीत मतदार आणि नागरिकांनी १३ मे रोजी होणाऱ्या मावळ लोकसभा निवडणुकीत मतदान करून जगातील सर्वात मोठ्या लोकशाही उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला यांनी केले.**




निगडी येथील इन्स्टिट्यूट ऑफ चार्टड अकाउंटंट ऑफ इंडियाच्या पिंपरी चिंचवड शाखेत आयोजित मतदान जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव, मतदान नोंदणी अधिकारी विनोद जळक, तहसीलदार जयराज देशमुख, समन्वयक अधिकारी विजय भोजने, मुकेश कोळप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, आयसीएआय संस्थेचे अध्यक्ष पंकज पाटणी, उपाध्यक्ष वैभव मोदी यांच्यासह प्रक्षिक्षणार्थी सनदी लेखापाल उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप उपक्रमाद्वारे मतदान जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात सहभाग घेवून सर्व सनदी लेखापाल, प्रशिक्षणार्थी यांनी स्वत: मतदान करण्यासोबत इतरांनाही प्रोत्साहीत करावे, असे आवाहन श्री.सिंगला यांनी केले. संस्थेतील यंदा प्रथमच मतदान

### सनदी लेखापालांनी शपथ घेतली

» मतदान हा प्रत्येक भारतीयाचा मूलभूत हक्क असून सर्व सनदी लेखापाल तसेच प्रशिक्षण घेत असलेल्या नवोदित विद्यार्थ्यांनी येत्या लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन श्री. पाटणी यांनी केले. यावेळी पिंपरी चिंचवड शहरातील प्रशिक्षणार्थी सनदी लेखापालांनी निवडणूकीत मतदान करण्याची शपथ घेतली.

# शिक्षण विभागाकडून मार्गदर्शक सूचना

## आरटीईअंतर्गत प्रवेशासाठी शाळांचा प्राधान्यक्रम निश्चित

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) प्रवेशासाठी शिक्षण विभागाने प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. त्यानुसार येत्या शैक्षणिक वर्षात आरटीईअंतर्गत प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून एक किलोमीटरच्या परिसरात अनुदानित शाळा, शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व शाळा या प्राधान्यक्रमानुसार आरटीई अंतर्गत प्रवेश दिला जाणार आहे.**



या शाळा उपलब्ध नसल्यासच स्वंयअर्थसहाय्यित शाळेत प्रवेश घेता येणार आहे.वंचित, दुर्बल, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना आरटीईअंतर्गत प्रवेश दिले जातात. शैक्षणिक वर्ष २०२४-२४ होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेसाठीच्या मार्गदर्शक सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध केल्या. आरटीई प्रवेशासाठी विद्यार्थ्याचे वय सहा वर्षापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. त्यासाठी मानीन दिनांक ३१ डिसेंबर निश्चित करण्यात आला आहे. या पूर्वी आरटीई अंतर्गत शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. तसेच आरटीई प्रवेशासाठी चुकीची माहिती भरून अर्ज केल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.यंदा आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी कायद्यात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा आणि त्यानंतर स्वंयअर्थसहाय्यीत शाळा या प्राधान्यक्रमानुसार प्रवेश दिला जाणार आहे. एखाद्या पालकाला प्राधान्यक्रम म्हणून अनुदानित शाळा ऐवजी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेची किंवा शासकीय शाळेची निवड करावयाची असल्यास पालकाच्या प्राधान्य क्रमानुसार संबंधित शाळा निवडता येईल. विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून एक किलोमीटरपर्यंतच्या अंतरावर अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांची शाळा नसल्यासच एक किलोमीटरच्या अंतरावरील स्वंयअर्थसहाय्यित शाळेत प्रवेश दिला जाणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच अपवादात्मक परिस्थितीत विद्यार्थ्याच्या घरापासून एक किलोमीटरच्या परिसरात शासकीय, अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थांची किंवा स्वंयअर्थसहाय्यित शाळा नसल्यास तीन किलोमीटरपर्यंतच्या अंतरावरील शाळेत त्याच प्राधान्यक्रमानुसार प्रवेश दिला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.आरटीई प्रवेशासाठी महानगरपालिकेच्या शाळा, नगरपालिका शाळा, नगर परिषद शाळा, नगरपंचायत शाळा, कटक मंडळाच्या शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,महानगरपालिकेच्या स्वयंअर्थसहाय्यित शाळा, खाजगी अनुदानित शाळा आणि स्वंयअर्थसहाय्यित याच शाळांमध्ये प्रवेश दिले जाणार आहेत. अल्पसंख्यांक शाळांमध्ये प्रवेश दिले जाणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पडताळणी समिती नेमण्याचे निर्देश देण्यात आले आहे. पडताळणी समितीने गेल्यावर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची आकडेवारी, सुधारित अधिसूचना विचारात घेऊन पडताळणीचे कामकाज वेळेत होण्याचे नियोजन करावे. तसेच जिल्हा, तालुका, नगरपालिका, महापालिका स्तरावर तक्रार निवारण केंद्र, मदत केंद्र स्थापन करण्याची सूचनाही देण्यात आली आहे.

### प्रवेश प्रक्रियेसाठीच्या मार्गदर्शक सूचना

» या शाळा उपलब्ध नसल्यासच स्वंयअर्थसहाय्यित शाळेत प्रवेश घेता येणार आहे.वंचित, दुर्बल, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना आरटीईअंतर्गत प्रवेश दिले जातात. शैक्षणिक वर्ष २०२४-२४ होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेसाठीच्या मार्गदर्शक सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध केल्या. आरटीई प्रवेशासाठी विद्यार्थ्याचे वय सहा वर्षापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. त्यासाठी मानीन दिनांक ३१ डिसेंबर निश्चित करण्यात आला आहे. या पूर्वी आरटीई अंतर्गत शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. तसेच आरटीई प्रवेशासाठी चुकीची माहिती भरून अर्ज केल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.यंदा आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी कायद्यात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा आणि त्यानंतर स्वंयअर्थसहाय्यीत शाळा या प्राधान्यक्रमानुसार प्रवेश दिला जाणार आहे. एखाद्या पालकाला प्राधान्यक्रम म्हणून अनुदानित शाळा ऐवजी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेची किंवा शासकीय शाळेची निवड करावयाची असल्यास पालकाच्या प्राधान्य क्रमानुसार संबंधित शाळा निवडता येईल.

---

# विकासकामे करणे म्हणजे एक्टिंग करण्यासारखं नाही

## पुणे-नाशिक हायवेसाठी आमचे योगदान : आढळराव पाटील

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे नाशिक हायवेसाठी २००८ ते २०१३ तत्कालीन काँग्रेस सरकारसोबत भांडलो. त्यानंतर मंजुरी मिळाली तर नितीन गडकरी यांच्या कार्यकाळात टेंडर निघाले.**




आज बोलणारे त्यावेळी राजकारण नव्हते, यामध्ये मी केलेला पाठपुरावा दाखवतो त्यांनी त्यांचे योगदान दाखवावे,असा टोला शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महायुती उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी अमोल कोल्हे यांना लगावला आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे आढळराव पाटील विरुद्ध महाविकास आघाडीकडून अमोल कोल्हे यांच्यामध्ये सरळ लढत होत आहे यामध्ये आता वंचित ने देखील उडी घेतल्या असून मंगलदास बांदल यांना उमेदवारी जाहीर केली आहे. काल आढळराव पाटील यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी हडपसरमध्ये शिवसेनेच्या वतीने मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यानंतर पत्रकारांशी बोलताना आढळराव पाटील यांनी अमोल कोल्हे यांच्यावर हल्लाबोल केला.

### अमोल कोल्हेंवर निशाणा

» बैलगाडा बंदी उठवण्यासाठी मी स्वतः औरंगाबाद खंडपीठात याचिका केली, पुढे हायकोर्टात देखील स्वतःच्या पैशाने लढलो. ही बंदी उठवण्यासाठी केलेल्या आंदोलनाच्या केसेस देखील माझ्या अंगावर आहेत. आज जे श्रेय घेण्याचा प्रयत्न करतात त्यांचा बैलगाड्याशी काही संबंध नाही ते केवळ घोडीवर बसणारे आहेत. त्यांनी गेल्या पाच वर्षात कोणतेही काम केलं नाही, त्यांच्याकडे केवळ बोलण्याची कला असून गोड गोड बोलतात. एखादे विकासकाम करणे म्हणजे एक्टिंग करण्यासारखे सोपे नाही, असा घणाघात आढळराव पाटील यांनी केला आहे.

# खासदार श्रीरंग बारणे यांनी मेट्रोमध्ये साधला प्रवाशांशी संवाद!

## पुढील टप्प्यात निगडी ते वाकड व वाकड ते चाकण मेट्रो मार्गाचा प्रस्ताव

### मेट्रो सेवेवर प्रवासी खूश, काही सुधारणा करण्याचीही सूचना

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (बुधवारी) सकाळी महा मेट्रोने प्रवास करीत प्रवाशांशी संवाद साधला. पिंपरी ते भक्ती- शक्ती या टप्प्यानंतर निगडी- किवळे- रावेत- वाकड तसेच वाकड- नाशिक फाटा- भोसरी- चाकण या दोन नवीन मेट्रो मार्गाचा प्रस्ताव असल्याचे बारणे यांनी यावेळी प्रवाशांना सांगितले.**



खासदार बारणे यांनी आज सकाळी पिंपरी ते दापोडी दरम्यान महामेट्रोने प्रवास केला. त्यांच्या समवेत शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर पिंपरी चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस युवा सेना जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे तसेच अनेक पदाधिकारी होते.

खासदार बारणे यांनी पाठपुरावा करून पिंपरी ते भक्ती- शक्ती या मेट्रो मार्गाला परवानगी मिळविल्याबद्दल प्रवाशांनी त्यांना धन्यवाद दिले. पुढील टप्प्यामध्ये निगडी- किवळे- रावेत- वाकड या मेट्रो मार्गाचा प्रस्ताव आहे. हा मार्ग शिवाजीनगर- हिंजवडी या मार्गाला जोडला जाईल. या खेरीज वाकड- नाशिक फाटा- भोसरी- चाकण हा मेट्रो मार्ग देखील प्रस्तावित आहे. त्यामुळे शहरातील मेट्रो सेवेचे जाळे बऱ्यापैकी विस्तारले जाणार आहे, अशी माहिती बारणे यांनी यावेळी दिली.

मेट्रोमुळे प्रवास सुखकारक, आनंददायक होत असून वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होत असल्याचे प्रवाशांनी यावेळी आवर्जून सांगितले.

### प्रवाशांना बसला सुखद धक्का

» मेट्रो स्थानाकांजवळ प्रशस्त वाहनतळाची सोय व्हावी, अशी अपेक्षा काही प्रवाशांनी व्यक्त केली. खासदार बारणे यांना मेट्रो स्थानकावर पाहून प्रवाशांना सुखद धक्का बसला. अनेक प्रवाशांनी पुढे येऊन खासदार बारणे यांची भेट घेतली व त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या. अनेक प्रवाशांनी मेट्रोच्या कोचमध्ये बारणे यांच्या समवेत सेल्फी देखील घेतले.

---

# वडगाव मावळमध्ये संजोग वाघेरे यांच्या उपस्थितीत नियोजन आढावा बैठक उत्साहात

## शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा सहभाग

। वडगाव मावळ । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार गट) यांच्या सर्व पदाधिकारी, समन्वयक आणि कार्यकर्ते यांची मावळ लोकसभा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या उपस्थितीत प्रचार नियोजन आढावा बैठक वडगाव येथील द्वारकाधीश मंगल कार्यालय येथे नुकतीच पार पडली.**



जिल्हाप्रमुख शिरीष घरत, तालुकाप्रमुख संदीप तांडेल, न्यू पनवेलचे शहर प्रमुख नितीन देशमुख शहर संघटिका अपूर्वा प्रभू, राष्ट्रवादी व्यापारी संघ जिल्हाध्यक्ष सनी जामदार, आकाश चतुर्वेदी, मंगेश रोकडे, हरिश्चंद्र निंबळेकर, उत्तम भोईर, सचिन मते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

मावळ लोकसभा मतदार संघातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर मतदार संघातील प्रचाराचे नियोजन करून कोपरा सभा, गावभेट दौरा, मेळाव्यांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे मावळ लोकसभेत प्रचार दौऱ्याचे नियोजन जोमात अशी चर्चा होवू लागली आहे. उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना लोकसभेत पाठ्वाण्यसाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागले आहेत.

दरम्यान, प्रचार नियोजन आढावा बैठकी नंतर उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी लोणावळा येथील अस्लमभाई यांच्या निवास्थानी सदिच्छा भेट घेतली. पंचवटी सोसायटी, उसराळी ग्रामपंचायत ग्रुप, पनवेल गाव या ठिकाणी कार्यकर्त्याशी संवाद साधला. तसेच तळोजा येथील आयेशा मजीद मध्ये इफ्तार पार्टीत सहभाग घेतला. अफरोज अब्दुल, बशीर शेख, सुलतान मालदार, रमझान शेख यांची भेट घेतली. नवीन पनवेलच्या सेक्टर 16 येथील कर्नाटक हॉल मध्ये कार्यकर्त्यांसोबत चर्चा झाली.

### संजोग वाघेरे यांना पाठिंबा...

» मावळ लोकसभा हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. या जागेवर वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी गद्दारी करणा-यांना घरी बसविण्यासाठी ही निवडणूक आहे. मावळमधून फक्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे शिलेदार संजोग वाघेरे पाटील यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू, असा विश्वास यावेळी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# निवडणूक प्रचारात कचाथीवूचा शंखनाद!



## भूमिका

**निवडणूक जाहीर झाल्यानंतर राजकीय नेत्यांचा आणि पक्षांचा खरा कस हा भोवतालच्या सामाजिक-राजकीय मुद्द्यांचा प्रभावीपणे वापर करण्यात लागतो. काही मुद्दे जाणूनबुजून गाडले जातात तर काही जुने उकरून काढले जातात.मात्र मतदानाच्या वेळी मतदारांच्या मानसिकतेवर प्रभाव टाकणारे कथानक रचणे एकूणच गरजेचे ठरते. सध्या चर्चेत असलेला कचाथीवू बेटाचा मुद्दा ही अशीच एक राजकीय प्रचाराची गरज!**

भारत – श्रीलंकेदरम्यान असणारी पाल्कची सामुद्रधुनी धार्मिक कारणांसाठी कायमच चर्चेत असते. या दोन्ही देशांना जोडणारा रामसेतू याच परिसरातील. इथेच साधारणत: १४ व्या शतकात ज्वालामुखीचा उद्रेक होऊन तमिळनाडूतील धनुष्कोडीच्या समुद्रकिनाऱ्यापासून २० मैल उत्तरेला १८५ एकराचा एक सागरी भूभाग वर आला. तेच हे कचाथीवू बेट! अनेक ऐतिहासिक दस्तावेजांनुसार त्याची मालकी तमिळनाडूतील एका राजघराण्याकडे होती. पुढे ब्रिटिशांनी हा भूभाग भाडेतत्त्वावर घेतला. मात्र इथे ११० वर्षांपासून अस्तित्वात असणाऱ्या सेंट अँटनी चर्चच्या कागदपत्रांनुसार बेटावरील महसुली हक्क श्रीलंकेमधील जाफना या उत्तरेकडील प्रांताकडे आहेत. एकूणच या वादाची पार्श्वभूमी वसाहतकालीन! पुढे दोन्ही देशांच्या स्वातंत्र्यानंतर या बेटाच्या परिसरात सीमारेषेची



आखणी स्पष्टपणे न होता त्यावर दोन्ही देशांनी आपला मालकीहक्क सांगणे सुरूच होते. यातच १९७४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी या बेटावरील श्रीलंकेचे सार्वभौमत्व मान्य केले. दोनच वर्षांत दोन्ही देशांमध्ये या भागातील आर्थिक क्षेत्रांची वाटणी होऊन मासेमारीचे हक्क विभागले गेले.या निर्णयाचे तमिळनाडूच्या राजकीय आणि आर्थिक घडामोडींवर दूरगामी परिणाम झाले! परंपरेने हे कचाथीवू भारत- श्रीलंका प्रवासातील विश्रांतीस्थान होते. मच्छीमारांसाठी जाळी सुकविणे, इतर दुरुस्ती आदींसाठी ते उपयुक्त! तसेच सुमारे २० लाख तमिळ लोकसंख्या श्रीलंकेच्या उत्तरेकडील प्रांतात राहत असल्याने या बेटाचा परिसर दोन्ही देशातील तमिळ लोकांना सांस्कृतिक, सामाजिकदृष्ट्या विशेष महत्त्वाचा! कचाथीवूचे हस्तांतरण झाल्यानंतर तमिळनाडूमध्ये या निर्णयाला मोठा विरोध केला गेला. पुढे श्रीलंकेमध्ये यादवी सुरू झाल्यानंतर श्रीलंकन नौसेनेने भारतीय मच्छीमारांना या बेटाकडे फिरकण्यास मज्जाव केला. यातूनच श्रीलंकेद्वारा भारतीय मच्छीमारांच्या अटकेचे प्रमाण वाढले, प्रसंगी याची परिणती गोळीबारात होऊन काहींना जीवदेखील गमवावा लागला. तमिळनाडू सरकारच्या मते १९९१ ते २०११ दरम्यान कचाथीवू बेटावर अथवा लंकेच्या सागरी क्षेत्रात प्रवेश केल्यामुळे श्रीलंकन सेनेकडून केलेल्या गोळीबारात सुमारे ८५ मच्छीमार मारले गेले तर १८० हून अधिक जखमी झाले. २००९ मध्ये श्रीलंकेतील गृहयुद्ध समाप्त झाल्यानंतर परिस्थिती सुरळीत होईल अशी अपेक्षा असताना श्रीलंकेने भारतीय मच्छीमार समुद्रतळ खरवडून काढणारे तंत्रज्ञान ( BOTTOM TRAWLERS) वापरत असून यामुळे परिसरातील पर्यावरणाला धोका उत्पन्न होत आहे असा आक्षेप घेत पुन्हा भारतीय मच्छीमारांना या बेटाकडे येण्यापासून रोखले. एकूणच तमिळ राजकारण या बेटाच्या हस्तांतरणाने ढवळून निघाले आहे.कचाथीवूचा मुद्दा पुन्हा माध्यमांच्या केंद्रस्थानी आला कारण मेरठ प्रचारसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या बेटाचा केलेला उल्लेख! त्यांनी असा दावा केला की भारतीय भूभागांना काँग्रेसने क्षुल्लक समजून त्यांना दुसऱ्या देशांकडे सुपूर्द करण्यास मागे-पुढे पाहिले नाही. मात्र राजकारण बाजूला ठेवून विचार करायचा झाल्यास इंदिरा गांधींनी कचाथीवूचा ताबा श्रीलंकेकडे दिला यामागे काय कारण आहे? थोडे इतिहासाची पाने उलटून ७० च्या दशकाकडे जाऊ.शीतयुद्ध धुमसत असतानाचा हा कालखंड! १९७१ च्या युद्धात सोव्हिएत रशियाशी उघड मैत्री केल्यानंतर भारत कम्युनिस्ट गटाचा भाग मानला जाऊ लागला होता. शेजारी राष्ट्रातील पाकिस्तान अधिकृतपणे अमेरिका पुरस्कृत गटाचा सदस्य होता.अशा परिस्थितीत शेजारी राष्ट्र म्हणून श्रीलंकेला पाश्चिमात्य राष्ट्रांच्या कळपात जाऊ देणे भारताच्या हितसंबंधांना मारक ठरले असते. यासाठी कचाथीवूचे उदक श्रीलंकेच्या हातावर सोडण्याचा विचार तत्कालीन नेतृत्वाने केला असण्याची शक्यता आहे. तत्कालीन भारताच्या सामरिक विचारांचा परामर्श घेतला.

## संपादकीय »

# बहरातील मौनी!

***आपल्याला शांतता ऐकता येत नाही, असे कुमार गंधर्व म्हणत.***

आपल्याला शांतता ऐकता येत नाही, असे कुमार गंधर्व म्हणत. खरे आहे ते. इतके की घरात एखाद्या किरकिऱ्या तान्ह्या बाळापेक्षा शांत, सुस्वभावी बालकाची अधिक काळजी त्याच्या पालकांस वाटते. असे शांततेचा दुस्वास करण्याचे संस्कार रक्तातूनच आपल्या अंगी भिनले जात असल्यामुळे एखाद्या सुशांत, प्रगल्भ, अल्पभाषी/अल्पाक्षरी व्यक्तीपेक्षा सदैव वचावचा करणारी, तोंडाची टकळी सतत सुरू ठेवणारी व्यक्ती ही अधिक दिलखेचक ठरते. जत्रेत ज्याप्रमाणे साबणसदृश द्रावाचे फुगे लहानग्यांस आकृष्ट करतात त्याप्रमाणे समाजात शब्दांचे बुडबुडे हवेत सोडणारी व्यक्ती जनसामान्यांस अधिक आकर्षित करत असते. म्हणून आपली संस्कृती "बोलणाऱ्याची बोरे खपतात, पण अबोलांचे आंबेही खपत नाहीत", हे मान्य करते. हे इतपत एक वेळ ठीक. पण आवाज, नादास सतत महत्त्व देण्याच्या बौद्धिक अजागळपणामुळे शांत व्यक्ती मुखदुर्बळ गणली जाऊन बडबड्या असामींच्या तुलनेत अकार्यक्षम ठरवली .

अगदी आता आतापर्यंत 'आयआयटी'च्या विद्यार्थ्यांना मिळणारी कोटय़वधींची पॅकेजेस, एका विद्यार्थ्याला तीन-चार कंपन्यांनी गलेलठ्ठ पगारासह देऊ केलेली नोकऱ्यांची निमंत्रणे, असे बातम्यांचे ठरलेले विषय असायचे. देशातील प्रतिष्ठित आयआयटी संस्थांचा लौकिक 'सुपर रोजगारक्षम' विद्यार्थ्यांमुळे कायमच वृद्धिंगत होत गेला.

# विद्यार्थ्यांना मिळणारी कोट्यवधींची पॅकेजेस

'आयआयटींमधील अतिप्रतिष्ठित आयआयटी' समजल्या जाणाऱ्या आयआयटी-मुंबईसारख्या संस्थेत यंदा नोकरभरतीचे (कॅम्पस प्लेसमेंट) आकडे फार कमी आहेत. आयआयटी-मुंबईतील २०२४ च्या नोकरभरतीसाठी नोंदणी केलेल्या दोन हजार विद्यार्थ्यांपैकी ७१२ म्हणजे तब्बल ३६ टक्के विद्यार्थ्यांना यंदा अद्याप नोकरीच मिळालेली नाही. या नोकरभरतीचा हंगाम मे-जूनपर्यंत असतो, त्यामुळे त्यांना अजूनही संधी आहे. मात्र, एरवी डिसेंबरमध्ये होणाऱ्या नोकरभरतीच्या पहिल्याच टप्प्यात चांगल्या भरतीचा लौकिक असताना, यंदा मात्र मार्च उलटूनही नोकरीविना राहिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३६ टक्के असणे, हा चर्चेचा मुद्दा आहे. देशभरातील २३ आयआयटींमध्ये थोडय़ाफार फरकाने यंदा हेच चित्र असल्याचे निरीक्षण आहे.एरवी डिसेंबरमध्ये नोकरभरतीचा पहिला टप्पा पार पडल्यावर विद्यार्थ्यांना मिळालेल्या पॅकेजचा मोठा गवगवा



करणाऱ्या अनेक आयआयटींनी यंदा त्याबाबत चुप्पीच साधली होती. कारण एक तर मोठय़ा प्रमाणात भरतीच झाली नाही आणि दुसरे म्हणजे ऑफर मिळालेल्यांचे सरासरी पॅकेज इतके कमी होते, की अनेक आयआयटींना ते न सांगणेच उचित वाटले असावे.

उदाहरणच द्यायचे, तर 'इंडियन एक्स्प्रेस'ने जानेवारी २०२४ मध्ये दिलेल्या वृत्तात आयआयटी-दिल्लीच्या डिसेंबरमधील भरतीची आकडेवारी दिली आहे. त्यानुसार, यंदा १०५० विद्यार्थ्यांची पहिल्या टप्प्यात भरती झाली. गेल्या वर्षी ही संख्या १३०० होती. यात आणखी एक मुद्दा असा, की १०५० मध्ये केवळ थेट भरती झालेले नव्हते, तर भरतीआधीच्या उमेदवारीसाठी निवडण्यात आलेल्यांचाही या संख्येत समावेश होता. आयआयटीसारख्या देशातील प्रतिष्ठित शिक्षण संस्थेवर अशी वेळ का आली असावी याबाबत अभ्यासकांचा असा दावा आहे, की हे काही आयआयटीतील शिक्षणाचा दर्जा कमी झाल्याने घडते आहे, असे नाही. जगभरातील आर्थिक मंदी याला प्रामुख्याने कारणीभूत आहे. आयआयटीच्या नोकरभरतीत अनेक परराष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्या आवर्जून येतात. यंदा आयआयटी-मुंबईत आलेल्या अशा कंपन्यांची संख्या कमी असल्याने त्याचाही भरतीवर परिणाम झाल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या अनेकदा आवश्यकतेपेक्षा जास्तीची नोकरभरती करतात. गुणवान मनुष्यबळ आपल्याकडे राहावे, असा त्या मागचा हेतू असतो. यंदा मात्र अनेक कंपन्या आल्याच नाहीत, तर काहींनी हात आखडता घेतला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मी मशाल चिन्हावर निवडणूक लढवणार!

## » राजू शेट्टी यांचा हातकणंगलेमधून निवडणूक लढवण्याचा निर्णय

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि राज्यातील शेतकऱ्यांचे नेते राजू शेट्टी यांनी हातकणंगलेमधून स्वतंत्रपणे लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. राजू शेट्टींचा पक्ष महाविकास आघाडीत सहभागी होईल आणि मविआच्या पाठिंब्यावर ते निवडणूक लढवतील अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून ऐकायला मिळत होती. तसेच राजू शेट्टी यांच्या शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंबरोबर सातत्याने भेटीगाठी होत असल्याचं पाहायला मिळत होतं.**




त्यामुळे राजू शेट्टी ठाकरे गटाच्या मशाल या चिन्हावर हातकणंगलेमधून लोकसभा निवडणूक लढणार असल्याची चर्चादेखील रंगू लागली होती. ठाकरे गटाने राजू शेट्टींना तसा प्रस्तावदेखील दिला होता. परंतु, शेट्टी यांनी हा प्रस्ताव नाकारत 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. दरम्यान, राजू शेट्टी यांनी ठाकरे गटाचा प्रस्ताव नाकारण्याचं कारणही स्पष्ट केलं आहे.राजू शेट्टी म्हणाले, स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या काही बैठकांमध्ये आम्ही स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. स्वाभिमानीने गेल्या तीन वर्षांपासून लोकसभा निवडणुकीची स्वतंत्र तयारी केली होती. परंतु, मधल्या काळात भाजपाविरोधातील मतांची विभागणी टाळण्यासाठी आम्ही महाविकास आघाडीचा पाठिंबा घ्यावा असा विचार आमच्या काही सदस्यांनी मांडला होता. त्याचबरोबर महाविकास आघाडीचे नेते सातत्याने सांगत होते की, ते हातकणंगले लोकसभा मतदारसंघात उमेदवार देणार नाहीत. ही जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला सोडणार, असं म्हणत होते.

मविआने हातकंणगलेत उमेदवार देऊ नये, जेणेकरून भाजपाच्या विरोधातील मतांची विभागणी होणार नाही, अशी भूमिका घेऊन मी दोन वेळा ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना भेटलो होतो. आमच्यात यावर सविस्तर चर्चा झाली. त्यातले काही मुद्दे उद्धव ठाकरे यांना पटले. त्यावर त्यांनी लवकरच निर्णय घेऊ असं आम्हाला सागितलं होतं. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख म्हणाले, काही दिवसापूर्वी अचानक काय झालं माहिती नाही, मला ठाकरे गटाकडून निरोप आला

### तीन वर्षांपासून निवडणुकीची तयारी

» आम्ही आधीच स्वतंत्र निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली आहे. मशाल या चिन्हावर हातकणंगलेमधून लोकसभा निवडणूक लढणार असल्याची चर्चादेखील रंगू लागली होती. ठाकरे गटाने राजू शेट्टींना तसा प्रस्तावदेखील दिला होता. परंतु, शेट्टी यांनी हा प्रस्ताव नाकारत 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. दरम्यान, राजू शेट्टी यांनी ठाकरे गटाचा प्रस्ताव नाकारण्याचं कारणही स्पष्ट केलं आहे.राजू शेट्टी म्हणाले, स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या काही बैठकांमध्ये आम्ही स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. स्वाभिमानीने गेल्या तीन वर्षांपासून लोकसभा निवडणुकीची स्वतंत्र तयारी केली होती. परंतु, मधल्या काळात भाजपाविरोधातील मतांची विभागणी टाळण्यासाठी आम्ही महाविकास आघाडीचा पाठिंबा घ्यावा असा विचार आमच्या काही सदस्यांनी मांडला होता. त्याचबरोबर महाविकास आघाडीचे नेते सातत्याने सांगत होते की, ते हातकणंगले लोकसभा मतदारसंघात उमेदवार देणार नाहीत. ही जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला सोडणार, असं म्हणत होते.

की, मी मशाल चिन्हावर निवडणूक लढली पाहिजे. परंतु, मशाल हे शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचं चिन्ह आहे. ते चिन्ह घेणं म्हणजे मी शिवसेनेत अधिकृतपणे प्रवेश केलाय असा त्याचा अर्थ होतो. मी गेली ३० वर्षे शेतकरी चळवळीत काम करत आहे. मी आयुष्यात कोणत्याही राजकीय पक्षात काम केलेलं नाही. निवडणूक लढवता यावी म्हणून आम्ही स्वाभिमानी शेतकरी संघटनेची स्थापना केली. या पक्षाच्या माध्यमातून अनेकदा निवडणुका लढवल्या. परंतु, आता व्यक्तीगत अथवा राजकीय फायद्यासाठी मी शेतकऱ्यांना आणि संघटनेला वाऱ्यावर सोडून निवडणूक लढवू शकत नाही. त्यामुळे मी मशाल या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवणार नाही असं ठाकरे गटाला कळवलं आहे. त्यावर त्यांनी आता हातकणंगलेत उमेदवार जाहीर केला आहे. तो त्यांचा निर्णय आहे.

# हिंगोलीचा उमेदवार बदलण्याची नामुष्की

## » आता बाबूराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी दिली

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना शिंदे गटाने काही दिवसांपूर्वीच लोकसभा उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. शिंदे गटाने एकूण आठ उमेदवारांची नावे जाहीर केली होती.**



हिंगोलीमधून हेमंत पाटील यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर हेमंत पाटील यांनी मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू केला होता. मात्र आठवड्याभरातच आता हेमंत पाटील यांचे नाव मागे घेण्याची वेळ शिंदे गटावर आली आहे. त्यांच्याऐवजी आता बाबूराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे २६ एप्रिल रोजी हिंगोली मतदारसंघाचे मतदान पार पडणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची ४ एप्रिल ही शेवटची मुदत आहे. अर्ज भरण्याची मुदत संपण्याच्या एक दिवस आधी ठरलेला उमेदवार मागे घ्यावा लागला आहे.हिंगोली लोकसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार खासदार हेमंत पाटील यांची उमेदवारी बदलण्यासंदर्भात भाजपाकडून दबावतंत्र सुरू झाल्यानंतर खासदार पाटील यांच्या समर्थनार्थ २०० गाड्या भरून कार्यकर्ते मुंबईला आणले गेले होते. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी हेमंत पाटील डेरेदाखल झाले. हिंगोली मतदारसंघातील भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी दोन दिवसांपूर्वी घेतलेल्या बैठकीत हेमंत पाटील यांच्याऐवजी धनुष्यबाण या चिन्हावर अन्य कोणालाही उमेदवारी द्यावी, असा सूर निघाला होता. त्यानंतर भाजपाचे शिष्टमंडळ सोमवारी देवेंद्र फडणवीस यांना परभणी येथे भेटले होते.

### कोण आहेत कोहळीकर?

» २००९ साली त्यांनी शिवसेनेकडून हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविली होती. मात्र त्यात त्यांचा पराभव झाला. हिंगोलीमधून हेमंत पाटील यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर हेमंत पाटील यांनी मतदारसंघात जोरदार प्रचार सुरू केला होता. मात्र आठवड्याभरातच आता हेमंत पाटील यांचे नाव मागे घेण्याची वेळ शिंदे गटावर आली आहे.बाबूराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे २६ एप्रिल रोजी हिंगोली मतदारसंघाचे मतदान पार पडणार आहे.

हिंगोली लोकसभा मतदार संघात सलग दुसऱ्यांदा विजय मिळविता येत नाही असा राजकीय इतिहास असताना खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी देण्याचा निर्णय शिवसेनेच्या शिंदे गटाने घेतला. मात्र हा निर्णय आता बदलण्याची नामुष्की शिंदे गटवर आली. त्यामुळे सलग दुसऱ्यांदा विजयी होण्याची परंपरा याहीवेळी खंडीत झाली आहे.शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख बाबूराव कोहळीकर यांनी शिवसनेनेच्या फुटीनंतर शिंदे गटात प्रवेश केला होता. हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे ज्येष्ठ नेते म्हणून त्यांना ओळखले जाते.

# संजय निरुपमांचा घरचा आहेर!

## आम्हाला दाबलं आणि आम्ही दबले गेलो : निरुपम

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या ठाकरे गटाने गेल्या आठवड्यात त्यांची लोकसभेच्या १७ उमेदवारांची यादी जाहीर केली. या यादीनुसार काँग्रेसच्या पारंपरिक मतदारसंघातही ठाकरे गटाने उमेदवार उभे केले आहेत. जागावाटपावरून महाविकास आघाडीत आधीपासूनच धुसफूस सुरू होती. परंतु, आता यादी जाहीर केल्यानंतर ही धुसफूस चव्हाट्यावर आली आहे. काँग्रेसचे माजी खासदार संजय निरुपम यांनी आठवडाभरापूर्वी पत्रकार परिषद घेऊन शिवसेना आणि काँग्रेसच्या नेतृत्त्वावर टीका केली आहे. त्याचबरोबर, शिवसेनेकडून (ठाकरे गट) मुंबईत काँग्रेसला दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जातोय, असा आरोपही त्यांनी केला.**





संजय निरुपम हे मुंबई उत्तर-पश्चिम म्हणजेच मुंबई वायव्य लोकसभा मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. २०१९ च्या निवडणुकीत गजानन कीर्तिकर यांनी त्यांचा पराभव केला होता. परंतु, गजानन किर्तीकर आता शिंदे गटात गेले आहेत, मात्र त्यांचे पूत्र अमोल कीर्तिकर मात्र ठाकरे गटातच आहेत. महाविकास आघाडीत मुंबई उत्तर पश्चिम लोकसभेवरून ठाकरे गट आणि काँग्रेसध्ये रस्सीखेच चालू होती. परंतु, हा मतदारसंघ ठाकरे गटाने आपल्याकडे घेत अमोल कीर्तिकरांना येथून उमेदवारी दिली आहे. परिणामी निरुपमांचा पत्ता कट झाला आहे. त्यामुळे निरुपम हे ठाकरे गटासह पक्षनेतृत्वावर संतापले आहेत.निरुपम म्हणाले होते, “वरिष्ठ नेतृत्त्वांकडून माझी अपेक्षा होती की २०१९ ला निवडणूक हरल्यानंतरही मी मुबई उत्तर-पश्चिम मतदारसंघात सक्रीय असल्यामुळे ते या जागेवर मला उमेदवारी देतील. कारण मला येथून निवडणूक लढवण्याचा मला अधिकार आहे. परंतु, शिवसेनेने आम्हाला दाबलं आणि आम्ही दबले गेलो आहोत. ठाकरे गटासारख्या जनाधार नसलेल्या पक्षासमोर काँग्रेसने झुकणं हा श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम सुरू आहे असं वाटतंय. त्यामुळे मी काँग्रेसच्या नेतृत्त्वाला सांगू इच्छितो की येत्या आठवड्याभरात मी वाट पाहीन. माझ्यासमोर अनेक पर्याय खुले आहेत. आता जे काही होईल ते आरपार होईल. येत्या आठवड्याभरात याबाबत तुम्हाला घोषणा ऐकायला मिळेल. हायकमांडच्या मनात आमच्यासारख्या कार्यकर्त्यांबाबत काय भावना आहेत त्या ऐकण्यासाठी एक आठवड्याची वाट पाहीन.”निरुपम यांनी काँग्रेस हायकमांडला इशारा देऊन एक आठवडा उलटला आहे. त्यामुळे निरुपम यांनी आज (३ एप्रल) पुन्हा एकदा एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून काँग्रेस हायकमांडला दिलेल्या अल्टिमेटमची आठवण करून दिली. तसेच ते म्हणाले, काँग्रेसने माझ्यावर अधिक ऊर्जा आणि स्टेशनरी (साधनसामग्री) वाया घालवू नये. त्याउलट त्यांची उरलीसुरली ऊर्जा आणि स्टेशनरी पक्ष वाचवण्यासाठी वापरावी. तसंही काँग्रेस पक्ष मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. मी पक्षाला एक आठवड्याचा अल्टिमेटम दिला होता. तो कालावधी आज संपतोय. उद्या मी स्वतः निर्णय घेईन.घटकपक्ष असलेल्या ठाकरे गटाने गेल्या आठवड्यात त्यांची लोकसभेच्या १७ उमेदवारांची यादी जाहीर केली.जागावाटपावरून महाविकास आघाडीत आधीपासूनच धुसफूस सुरू होती. परंतु, आता यादी जाहीर केल्यानंतर ही धुसफूस चव्हाट्यावर आली आहे. काँग्रेसचे माजी खासदार संजय निरुपम यांनी आठवडाभरापूर्वी पत्रकार परिषद घेऊन शिवसेना आणि काँग्रेसच्या नेतृत्त्वावर टीका केली आहे. त्याचबरोबर, शिवसेनेकडून (ठाकरे गट) मुंबईत काँग्रेसला दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जातोय.

### आता जे काही होईल ते आरपार

संजय निरुपम हे मुंबई उत्तर-पश्चिम म्हणजेच मुंबई वायव्य लोकसभा मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. २०१९ च्या निवडणुकीत गजानन कीर्तिकर यांनी त्यांचा पराभव केला होता. परंतु, गजानन किर्तीकर आता शिंदे गटात गेले आहेत, मात्र त्यांचे पूत्र अमोल कीर्तिकर मात्र ठाकरे गटातच आहेत. महाविकास आघाडीत मुंबई उत्तर पश्चिम लोकसभेवरून ठाकरे गट आणि काँग्रेसध्ये रस्सीखेच चालू होती. परंतु, हा मतदारसंघ ठाकरे गटाने आपल्याकडे घेत अमोल कीर्तिकरांना येथून उमेदवारी दिली आहे. परिणामी निरुपमांचा पत्ता कट झाला आहे. त्यामुळे निरुपम हे ठाकरे गटासह पक्षनेतृत्वावर संतापले आहेत.निरुपम म्हणाले होते, “वरिष्ठ नेतृत्त्वांकडून माझी अपेक्षा होती की २०१९ ला निवडणूक हरल्यानंतरही मी मुबई उत्तर-पश्चिम मतदारसंघात सक्रीय असल्यामुळे ते या जागेवर मला उमेदवारी देतील. कारण मला येथून निवडणूक लढवण्याचा मला अधिकार आहे. परंतु, शिवसेनेने आम्हाला दाबलं आणि आम्ही दबले गेलो आहोत. त्यामुळे मी काँग्रेसच्या नेतृत्त्वाला सांगू इच्छितो की येत्या आठवड्याभरात मी वाट पाहीन. माझ्यासमोर अनेक पर्याय खुले आहेत. आता जे काही होईल ते आरपार होईल. येत्या आठवड्याभरात याबाबत तुम्हाला घोषणा ऐकायला मिळेल.

# उमेदवारी जाहीर होताच महुआ मोईत्राना झटका

## तृणमूलच्या मोईत्रा यांच्या विरोधात ईडीकडून मनी लाँडरिंगचा गुन्हा दाखल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि बडतर्फ खासदार महुआ मोईत्रा यांच्या विरोधात ईडीने प्रश्नांच्या बदल्यात पैसे मागितल्याप्रकरणी मनी लाँडरिंगचा गुन्हा दाखल केला आहे. कॅश फॉर क्वेरी प्रकरणावरील नीतिमत्ता समितीचा अहवाल आल्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोइत्रा यांना लोकसभेतून बडतर्फ करण्यात आले होते.**



मोइत्रा यांनी लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी व्यावसायिक दर्शन हिरानंदानी यांच्याकडून रोख रक्कम आणि महागड्या भेटवस्तू घेतल्या होत्या, असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. महुआ मोइत्रा आता पुन्हा एकदा लोकसभेच्या रिंगणात उतरल्या आहेत. टीएमसीने त्यांना पश्चिम बंगालमधील कृष्णानगर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. मात्र, यानंतर मोईत्रा यांच्यासमोरील अडचणी वाढल्या आहेत.केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने दोन दिवसांपूर्वीच महुआ मोईत्रा यांच्याविरोधात एफआयआर दाखल केला होता. ईडीने महुआ मोईत्रा यांना चौकशीसाठी दिल्ली कार्यालयात हजर राहण्याचे समन्स बजावले होते. मात्र समन्सला कोणतेही उत्तर न दिल्यामुळे त्यांच्याविरोधात खटला दाखल करण्यात आला आहे. फेमा कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी आता महुआ मोईत्राची चौकशी होणार आहे.बडतर्फ खासदार महुआ मोईत्रा यांना तृणमूल काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा क्रिष्णानगर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. व्यावसायिक हिरानंदानी यांच्याकडून लोकसभेत प्रश्न विचारण्याच्या बदलण्यात पैसे आणि भेटवस्तू स्वीकारल्याबद्दल त्यांना दोषी ठरविण्यात आले होते. व्यावसायिकाने महुआ मोईत्रा यांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून अदाणी समूहाच्या विरोधात प्रश्न विचारले. वकील जय अनंत देहाद्री यांनी सर्वप्रथम हे प्रकरण उजेडात आणले. त्यानंतर भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत हा मुंडा मांडून त्याबद्दल लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे टीकचा मांडला.


### महुआ मोईत्राची चौकशी होणार

महुआ मोइत्रा आता पुन्हा एकदा लोकसभेच्या रिंगणात उतरल्या आहेत. टीएमसीने त्यांना पश्चिम बंगालमधील कृष्णानगर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने दोन दिवसांपूर्वीच महुआ मोईत्रा यांच्याविरोधात एफआयआर दाखल केला होता. ईडीने महुआ मोईत्रा यांना चौकशीसाठी दिल्ली कार्यालयात हजर राहण्याचे समन्स बजावले होते. मात्र समन्सला कोणतेही उत्तर न दिल्यामुळे त्यांच्याविरोधात खटला दाखल करण्यात आला आहे. फेमा कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी आता महुआ मोईत्राची चौकशी होणार आहे.

# नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला

कुणाल खेमू दिग्दर्शित ‘मडगांव एक्सप्रेस’ हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करताना दिसत आहे. या चित्रपटाचं कौतुक देखील होत आहे. या चित्रपटात दिव्येंदू शर्मा, प्रतिक गांधी, अविनाश तिवारी, उपेंद्र लिमये, छाया कदम हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहेत. याशिवाय या चित्रपटात ग्लॅमरस डान्सर, अभिनेत्री नोरा फतेही झळकली आहे. या चित्रपटामुळे सध्या नोरा चर्चेत आली आहे. ‘मडगांव एक्सप्रेस’ या चित्रपटाच्या निमित्ताने दिव्येंदू, अविनाश आणि नोरा नुकतेच ‘मॅशबल इंडियन’ या युट्यूब चॅनलच्या ‘द बॉम्ब जर्नी’ या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला. ती म्हणाली, “जेव्हा मी भारतात पहिल्यांदा आली तेव्हा माझ्या जवळ ५ हजार रुपये होते. यावेळेस मला १०० डॉलर म्हणजे किती असतात हे अजिबात माहित नव्हतं. मी एका अपार्टमेंटमध्ये राहत होते. थ्री-बीएचके घर होतं. प्रत्येक रुममध्ये तीन मुली राहत होत्या, अशा एकूण नऊ वेड्या मुलींबरोबर मी राहत होते. हे माझ्यासाठी ट्रॉमा पेक्षा काही कमी नव्हतं. कधी कधी मला असं वाटायचं की, माझा भारतात येण्याचा निर्णय योग्य होता की चुकीचा होता.”पुढे नोरा म्हणाली, “संघर्षाच्या काळात





माझ्याकडे खूप कमी पैसे होते. त्यामुळे मी फक्त अंडी आणि ब्रेड खाऊन दिवस काढले. माझ्या घराचं भाडं मी ज्या एजन्सीत काम करत होती तेच देत होते. पण माझ्या पगारातून घराचं भाडं कापलं जात होतं. त्यामुळे माझ्या हातात येणारा पगार खूप कमी होता. त्या पगारात मुंबई सारख्या शहरात राहणं खूप कठीण आहे.”याआधी नोरा तिच्या संघर्षाविषयी अनेकदा बोलली होती. २०१९मध्ये एका मुलाखतीमध्ये ती म्हणाली होती, “संघर्षाच्या काळात ज्या एजन्सीत काम केलं ते आठवड्याचे फक्त तीन हजार रुपये देत होती. त्यामुळे संपूर्ण घर खर्च करून आठवड्याच्या शेवटी हातात पैसे नसायचे.”दरम्यान, नोरा ही ३२ वर्षांची आहे. या वयात ती बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. नोराने टेलिव्हिजनवरील अनेक डान्स रिॲलिटी शोचे परीक्षण केलं होतं. याशिवाय ती ‘स्त्री’, ‘बाटला हाउस’, ‘बाहुबली द बिगनिंग’, ‘क्रँक’ यांसारख्या चित्रपटात झळकली आहे.

## अदाने नेसली चक्क 15 रुपयांची साडी

‘द केरला स्टोरी’ चित्रपटातील जबरदस्त अभिनयामुळे अभिनेत्री अदा शर्मा चर्चेत आली. या चित्रपटासाठी अदाला अनेक पुरस्कारदेखील जाहीर झाले आहेत. अदा अभिनयासह आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टीही चाहत्यांबरोबर शेअर करत असते. अनेकदा अदाने तिच्या नानीचा म्हणजेच आजीचा उल्लेख केला आहे. ‘गुलाबी साडी’ या मराठमोळ्या गाण्यावर नात अदा आणि तिच्या आजीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला होता. अशातच अदाचा आजीशी कनेक्ट असणारा अजून एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आज अदाने खास तिच्या आजीची साडी नेसली होती. आजीची साडी नेसायची अदाची ही काही पहिलीच वेळ नाही. पण, विशेष गोष्ट म्हणजे या साडीची किंमत फक्त १५ रुपये आहे असं ती म्हणाली.

## सोनम ड्रेसमुळे झाली ट्रोल

सोनम कपूर ही फॅशन आयकॉन, फॅशन दिवा या नावांनी इंडस्ट्रीमध्ये प्रचलित आहे. अभिनयाबरोबरच ती आपल्या वेगवेगळ्या लूक्समुळे सतत चर्चेत असते. सोनमनं नुकतीच तिच्या बुक लॉंचला हजेरी लावली होती. या लॉंच सोहळ्याला सोनमने काळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. तिच्या या लूकचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.सोनमच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत तिला ट्रोल केलं आहे. एकानं कमेंट करीत लिहिलं, “दारा सिंगसारखी दिसतेय.” तर, “ही नाईट ड्रेसवर का फिरतेय.” असं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. “हिचा ड्रेसिंग सेन्स कुठे गेला”, असंही एकानं विचारलं. “सोनमनं उशांची कव्हर्स घातली आहेत, असं वाटतंय. जर कोणती गोष्ट सध्या ट्रेंडमध्ये किंवा फॅशनमध्ये असली तरी ती प्रत्येकाला शोभून दिसेल असं नसतंबॉलीवूडमधली फ्लॉप अभिनेत्री” असं एका युजरने लिहिलं. “यापेक्षा वाईट ड्रेस मी आजपर्यंत बघितला नाही.”, “चालता फिरता हँगर”, “ती हँगरमधून ड्रेस काढायला विसरली” अशा प्रकारच्या ट्रोल्स करणाऱ्या कमेंट्स सोनम कपूरच्या व्हिडीओवर करण्यात आल्यात.



## इंडस्ट्रीतला आऊटसायडर ते आम आदमीचा हिरो!

घरी चित्रपटाशी संबंधित कुणीही नाही, मूळ गाव मुंबानगरीपासून हजारो किलोमीटर दूर हिमाचल प्रदेशात, अल्फा मेल अर्थात पौरुष अवतारी प्रतिमा नाही, सिक्स पॅक ॲब्स नाहीत. चित्तथरारक स्टंट केल्यानंतर ललनांच्या गराड्यात वगैरेही नाही. हिंदी मालिका आणि टीव्ही सृष्टीच्या हिरोच्या पारंपरिक प्रतिमेला छेद देत पडद्यावर आम आदमी साकारुन त्यालाच नायकत्व देणाऱ्या विक्रांतचा आज वाढदिवस. टीव्ही मालिकांमध्ये काम करू लागल्यानंतर मंडळी तिथेच स्थिरावतात. पण विक्रांतने टीव्ही ते चित्रपट असं स्थित्यंतर केलं. सुरुवातीला पदरी पडलेल्या छोट्या भूमिका चोख निभावत विक्रांतने वाटचाल सुरू ठेवली. 12TH FAIL निमित्ताने विक्रांतला हिरो करणारी कहाणी पडद्यावर आली. चंबळसारख्या दुर्गम भागातून सुरुवात करून थेट प्रशासकीय अधिकारी झालेल्या मनोज शर्मा यांची कारकीर्द विक्रांतने सुरेख साकारली. याचा प्रत्यय चाहत्यांच्या प्रतिक्रिया, पुरस्कार आणि सोशल मीडियावर वाढते फॉलोअर्स यातून सिद्ध होताना दिसत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने विक्रांतच्या सफरीचा घेतलेला धांडोळा. विक्रांतचं कुटुंब मूळचं हिमाचल प्रदेशमधील शिमल्याचं. त्याच्या वडिलांचं नाव जॉली आणि आईचं नाव आमना आहे. त्याला मोईन नावाचा मोठा भाऊ आहे. त्याच्या वडिलांचं कुटुंब ख्रिश्चन धर्म पाळतं, तर त्याच्या आईचं कुटुंब शीख आहे. विक्रांतच्या आई-बाबांनी पळून जाऊन लग्न केलं होतं, नंतर ते काही काळ विदर्भातील नागभीड इथं राहत होते.

## तापसी पन्नूच्या सिक्रेट लग्नातील पहिला व्हिडीओ

बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू गेल्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. जवळच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत तिने बॉयफ्रेंड मॅथियस बोशी लग्न केल्याचं वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आलं होतं. परंतु, यावर तापसीने कुठेही अधिकृतपणे भाष्य केलं नव्हतं. यामुळे नेमकं तिचं लग्न झालंय की नाही? याबाबत साशंकता निर्माण झाली होती. अशातच तिच्या लग्नातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने तापसी लग्नबंधनात अडकल्याचं अखेर स्पष्ट झालं आहे.जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीमध्ये तापसी राजस्थानमधील उदयपूरमध्ये विवाहबंधनात अडकली आहे. वरमाला विधीसाठी अभिनेत्रीने लग्नमंडपात थाटामाटात एन्ट्री घेतली होती. लाल रंगाचा भरजरी पंजाबी ड्रेस, डोळ्यावर गॉगल, हातात लग्नाचा चुडा अशा खास अंदाजात तापसी मंडपात आली होती.तापसी पन्नूने लग्नसमारंभात पंजाबी गाण्यावर एन्ट्री घेतल्याचं पाहायला मिळालं. नववधूच्या रुपात ती अतिशय सुंदर दिसत होती. तसेच मॅथियस बोने देखील यावेळी पारंपरिक लूक केला होता. एकमेकांना वरमाला घातल्यावर या जोडप्यावर सगळ्यांनी फुलांची उधळण केली. तापसीच्या लग्नातील हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांनी अभिनेत्रीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अजूनही तापसीने लग्नाबाबत कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही. दरम्यान, तापसी माजी बॅडमिंटनपटू मॅथियस बोबरोबर जवळपास दहा वर्षांपासून रिलेशनशिप होती. आता या जोडप्याने लग्न केलं आहे. अनुराग कश्यप आणि कनिका ढिल्लों हे दोघे तिच्या लग्नाला उपस्थित होते.



# कोलकाता नाईट रायडर्सचा मोठा विजय!

## दिल्ली कॅपिटल्सचा तब्बल 106 धावांनी उडवला धुव्वा

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील १६ वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात विशाखापट्टणम येथे खेळला गेला. या सामन्यात केकेआरने प्रथम फलंदाजी करताना २७२ धावा करत आयपीएलमधील इतिहासातील दुसरी सर्वात मोठी धासंख्या उभारली होती, ज्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सचा संघ १६६ धावांवर गारद झाला. ज्यामुळे केकेआरने मोठा विजय मिळवता सामना १०६ धावांनी खिशात घातला. या विजयासह सलग तिसरा सामना जिंकत गुणातालिकेत अव्वल स्थान काबीज केले.**





केकेआरसाठी सुनील नरेन आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्या अर्धशतकांव्यतिरिक्त आंद्रे रसेलच्या ४१ धावांच्या तुफानी खेळीनेही कोलकाताला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले. त्यामुळे केकेआरने २० षटकांत ७ बाद २७२ धावा करताना दिल्ली कॅपिटल्सपुढे २७३ लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात खूपच खराब झाली होती. ज्यातून त्यांना शेवटपर्यंत सावरता आले नाही. दिल्लीसाठी कर्णधार ऋषभ पंतने ५५ धावा केल्या आणि ट्रिस्टन स्टब्सने ५४ धावांची अर्धशतकी खेळी खेळली असली, तरी संघाला १०६ धावांच्या पराभवापासून वाचवता आले नाही.कोलकाता नाईट रायडर्सने विशाखापट्टणममध्ये मोठी धावसंख्या उभारली आहे. त्यांनी २० षटकांत ७ गडी गमावून २७२ धावा केल्या. ही आयपीएलमधील दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या आहे. या मोसमात आयपीएलची सर्वात मोठी धावसंख्याही नोंदवली गेला. सनरायझर्स हैदराबादने मुंबई इंडियन्सविरुद्ध (२७ मार्च) २७७ धावा केल्या होत्या. त्याच वेळी, एकूण टी-२० क्रिकेटमध्ये ही आठव्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या आहे.

२७१ धावा ही कोलकात्याची आयपीएलमधील सर्वोच्च धावसंख्या आहे. यापूर्वी २०१८ मध्ये त्याने पंजाबविरुद्ध सहा विकेट्सवर २४५ धावा केल्या होत्या.केकेआरसाठी फिल सॉल्ट आणि सुनील नरेन यांनी डावाची सुरुवात केली. सॉल्ट केवळ १८ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला असला, तरी त्यानंतर सुनील नरेन आणि अंगक्रिश रघुवंशी यांच्यात दुसऱ्या विकेटसाठी १०४ धावांची भागीदारी झाली. एकीकडे नरेनने ३९ चेंडूत ७ चौकार आणि ७ षटकारांसह ८५ धावांची तुफानी खेळी केली. तर आयपीएलमधील पदार्पणाच्या डावात अंगक्रिशने २७ चेंडू खेळून ५४ धावा केल्या. या खेळीत त्याने ५ चौकार आणि ३ षटकार मारले. शेवटच्या षटकांमध्ये आंद्रे रसेलने ४१ धावा केल्या, तर रिंकू सिंगनेही ८ चेंडूत २६ धावांची छोटीशी खेळी खेळून महत्त्वपूर्ण योगदान दिले. कोलकाताने पहिल्या १० षटकात १३५ धावा आणि शेवटच्या १० षटकात १३७ धावा करत दिल्लीच्या गोलंदाजांचा घाम फोडला.दिल्ली कॅपिटल्ससाठी डावाची सुरुवात खूपच खराब झाली. डीसीने पहिल्या ३३ धावांत ४ महत्त्वाचे विकेट गमावले होते. त्यानंतर ऋषभ पंत आणि ट्रिस्टन स्टब्स यांच्यात पाचव्या विकेटसाठी ९३ धावांची भागीदारी झाली, पण डीसीला विजयापर्यंत नेण्यासाठी ती अपुरी ठरली. पंतने २५ चेंडूत ५५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी ,तर स्टब्सने ३२ चेंडूत ५४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली. त्यानंतर संघाने सातत्याने विकेट गमावल्या, त्यामुळे दिल्लीला १०६ धावांनी मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.फलंदाजीसोबतच गोलंदाजीतही कोलकाता नाईट रायडर्सने आपला दबदबा कायम राखला. वरुण चक्रवर्तीने ४ षटकात ३३ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. त्याचवेळी मिचेल स्टार्कने आयपीएल २०२४ मध्ये विकेटचे खातेही उघडले आहे. त्याने ३ षटकात २५ धावा देत २ विकेट्स घेतल्या. दरम्यान, वैभव अरोरानेही प्रभावित केले, ज्याने ४ षटकात २७ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. सुनील नरेन आणि आंद्रे रसेल यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतली.

### कोलकाता गुणतालिकेत टॉपवर

» केकेआर आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील लढतीपूर्वी गुणतालिकेत पहिल्या स्थानावर तीन सामन्यांमधील विजयासह राजस्थान रॉयल्सचा संघ होता. राजस्थाननं देखील तीन मॅचमध्ये 6 विजयांसह पहिलं स्थान आपल्याकडे मिळवलं होतं. तर, केकेआरनं दिल्ली कॅपिटल्सला 106 धावांनी पराभूत करत 6 गुण मिळवले आहेत. केकेआरचं नेट रनरेट 2.52 इतकं आहे. तर, राजस्थान रॉयल्सचं नेट रनरेट 1.25 इतकं असल्यान ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तर अनुक्रमे तिसऱ्या स्थानी चेन्नई सुपर किंग्ज तर चौथ्या स्थानी लखनऊ सुपर जाएंटस आहेत. केकेआरनं पहिल्यांदा फलंदाजी करताना 7 विकेटवर 277 धावा केल्या होत्या. त्याचा पाठलाग करताना दिल्लीचा संघ 17.2 ओव्हरमध्ये 166 धावांवर बाद झाला.

# भोसरीतील आदिनाथ क्रिकेट क्लब संघ उपांत्यपूर्व फेरीत

## पुणे जिल्हा क्रिकेट संघटना आयोजित शिंदे लीग क्रिकेट उत्साहात

।पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेचा वतीने आयोजित कै. सदू शिंदे लीग क्रिकेट स्पर्धेत भोसरीतील आदिनाथ क्रिकेट क्लबने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. आदिनाथ संघाने सर्वेश भट्टड (१३४ धावा)ची शतकी पारी व नवनाथ वाघमारे (५ गडी) याच्या भेदक माऱ्याच्या जोरावर मॉडर्न स्टार संघाचा ८७ धावांनी पराभव करीत उपांत्यपूर्व गाठली.**



रॉक २७ स्पोर्ट्स मैदानावर हा सामना पार पडला. नाणेफेक जिंकून प्रथम मॉडर्न संघाने प्रथम गोलंदाजी स्वीकारली. आदिनाथ संघाने २९. १ षटकात सर्वबाद २७६ धावा जमविल्या. आदिनाथ संघाकडून सर्वेश भट्टड १३४ धावा (८९ चेंडू, २३ चौकार, ३ षटकार) निलेश जाधव ४४ (२७चेंडू, ९चौकार,१ षटकार) निखिल जाधव २६ (२०चेंडू, ४चौकार,१ षटकार), निलेश जोगदंड २० (८चेंडू, २चौकार,२ षटकार) यांनी धावा काढल्या. मॉडर्न संघाकडून मुनीब बैग ३ गडी,अब्दुल्लाह मोहम्मद यांनी २ गडी बाद केले. ४५ षटकात २७७ धावांचा पाठलाग करतांना आदिनाथ संघाचा भेदक माऱ्यापुढे मॉडर्न संघाचा डाव १८९ धावत आटोपटला. फरहान मोमीण ५५ (२९ चेंडू, ९चौकार, २ षटकार), रोशन कामथ ४७ (३९ चेंडू, ७ चौकार, २ षटकार), अकबर अली खान ३२ (२७ चेंडू, ५ चौकार, १ षटकार) धावा काढीत प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. परंतु आदिनाथ संघाचा नवनाथ वाघमारे याचा भेदक माऱ्यापुढे ३२ धावात ५ गडी बाद करीत निम्मा संघ तंबूत तंबूत परतला. निलेश जाधव यांनी ३ गडी बाद केले. आदिनाथ संघाने ८७ धावांनी सामना जिंकत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. शतकी परी खेळणारा सर्वेश याला सामन्याचा मानकरी घोषित करण्यात आले.

### संक्षिप्त धावफलक..

» आदिनाथ क्रिकेट क्लब २९. १ षटकात सर्वबाद २७६ (सर्वेश भट्टड १३४,निलेश जाधव ४४,निखिल जाधव २६, मुनीब बैग ३/६०, अब्दुल्लाह मोहम्मद २/४५, सिराज काझी १/४५)

**विजयी विरुद्ध..**

मॉडर्न स्टार क्रिकेट क्लब २८.३ षटकात सर्वबाद १८९ (फरहान मोमीण ५५,रोशन कामथ ४७,अकबर अली खान ३२, नवनाथ वाघमारे ५/३२, निलेश जाधव ३/३०, श्रेयश जगदाळे १/३४)